निवृत्तिवेतनधारक / कुटुंब निवृत्तिवेतनधारकांना दि.०१ जुलै,२०२४ पासून ५३% महागाई वाढ देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

वित्त विभाग

शासन निर्णय क्रमांक : निमवा-२०२५/प्र.क्र.०५/सेवा ४

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
वित्त विभाग, मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २८ फ़ेब्रुवारी,२०२५.

वाचा -

वित्त विभाग शासन निर्णय क्रमांक : निमवा-२०२४/प्र.क्र.४९/सेवा ४,दिनांक १०.०७.२०२४.

शासन निर्णय -

शासन असा आदेश देत आहे की, राज्य शासकीय निवृत्तिवेतनधारक / कुटुंब निवृत्तिवेतनधारकांना त्यांच्या मूळ निवृत्तिवेतन/ कुटुंब निवृत्तिवेतनाच्या एकूण रकमेवर दिनांक ०१ जुलै, २०२४ पासून अनुज्ञेय महागाई वाढीचा दर ५०% वरुन ५३% सुधारीत करण्यात यावा. सदर महागाई वाढ दिनांक ०१ जुलै, २०२४ पासूनच्या थकबाकीसह माहे फ़ेब्रुवारी २०२५ च्या निवृत्तिवेतन / कुटुंब निवृत्तिवेतनासोबत रोखीने देण्यात यावी.

२. प्रत्येक वैयक्तिक प्रकरणी देय होणाऱ्या महागाई वाढीच्या रकमेची परिगणना करण्याची जबाबदारी ही निवृत्तिवेतन संवितरण प्राधिकारी म्हणजेच यथास्थिती, अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/कोषागार अधिकारी यांची राहील.

३. शासन असाही आदेश देत आहे की, ज्यांना निवृत्तिवेतन योजना लागू केलेली आहे अशा मान्यता व अनुदानप्राप्त शैक्षणिक संस्था, कृषी / कृषितर विद्यापीठे व त्यांच्याशी संलग्न असलेली अशासकीय महाविद्यालये यांमधील निवृत्तिवेतनधारक/कुटुंब निवृत्तिवेतनधारक यांना वरील निर्णय, योग्य त्या फेरफारांसह, लागू राहील.

४. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समिती अधिनियम, १९६१ (सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक पाच) च्या कलम २४८ च्या परंतुकान्वये प्रदान केलेले अधिकार आणि त्यासंबंधातील इतर सर्व अधिकार यांचा वापर करुन शासन असाही आदेश देत आहे की, वरील निर्णय जिल्हा परिषदांचे निवृत्तिवेतनधारक/कुटुंब निवृत्तिवेतनधारक यांनाही लागू राहील.

५. यासंबंधीचा खर्च वरील परिच्छेदांत नमूद केलेल्या निवृत्तिवेतनधारकांची निवृत्तिवेतने ज्या अर्थसंकल्पीय लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात येतात, त्या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो त्या त्या लेखाशीर्षांतर्गत मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

६. शासनाने वेळोवेळी मंजूर केलेल्या निवृत्तिवेतनावरील महागाई वाढी देण्याबाबतचे सध्या अस्तित्वात असलेले सर्व आदेश, योग्य त्या फेरफारांसह, आता मंजूर केलेल्या महागाई वाढीस देखील लागू राहतील.

७. या आदेशाची इंग्रजी प्रत सोबत जोडली आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२५०२२८१४४५३५५७०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

MANISHA YUVRAJ KAMTE

Digitally signed by MANISHA YUVRAJ KAMTE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FINANCE DEPARTMENT, 2.5.4.20=a7f08db3910ecf0f88c442fbde20f7b84e70dfd0bf4dcd977abab75b3fcb8508, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=11602E78DA072F96AF0EDE7966315FA5B93A2119E4A490D340E527F96DBA01D3, cn=MANISHA YUVRAJ KAMTE
Date: 2025.02.28 14:47:41 +05'30'

(मनिषा कामटे)
शासनाचे उपसचिव

प्रति,

१) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई,
२) महालेखापाल(लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर,
३) महालेखापाल (लेखापरीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई,
४) महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर,
५) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,
६) अधिदान व लेखा अधिकारी, वांद्रे, मुंबई,
७) संचालक, माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय, मुंबई,
८) संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, कोकण भवन, नवी मुंबई.
९) सह संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, कोकण / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.
१०) निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबइ,
११) सर्व कोषागार अधिकारी,
१२) सर्व विधानमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई
१३) मा.राज्यपाल यांचे सचिव,
१४) मा.मुख्यमंत्री यांचे सचिव,
१५) मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव,
१६) सर्व मंत्री व राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव,
१७) विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली,
१८) प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ न्याय शाखा) मुंबई,
१९) प्रबंधक, उच्च न्यायालय, (अपील शाखा),मुंबई,
२०) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
२१) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
२२) प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
२३) प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण मुंबई/नागपूर/औरंगाबाद

२४) मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, मुंबई.
२५) आयुक्त, राज्य माहिती आयोग (सर्व)
२६) सचिव, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकीय भवन, १ला मजला, मंत्रालयासमोर, मुंबई ४०००३२
२७) सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य महिला आयोग,गृहनिर्माण भवन (म्हाडा बिल्डींग), पोट माळा, वांद्रे पूर्व, मुंबई ४०० ०५१.
२८) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय ग्रंथालय, सहावा मजला, विधान भवन, मुंबई - ४०००३२.
२९) कार्याध्यक्ष, महाराष्ट्र पेन्शनर्स असोसिएशन, १४४९, सदाशिव पेठ, 'संकल्प खजिना महाल बोळ, एस.पी.कॉलेज समोर, पुणे ४११ ०३०
३०) कार्यवाह, बृहन्मुंबई पेन्शनर्स असोसिएशन, वर्ग क्र.२१, तळ मजला, छबिलदास हायस्कूल, वनमाळी हॉलसमोर, दादर (प), मुंबई-४०० ०२८.
३१) अध्यक्ष, महाराष्ट्र स्टेट गव्हर्नमेंट पेंशनर्स असोसिएशन बेळगाव, १०९१, अनंतशयन गल्ली, लक्ष्मी निवास, दुसरा मजला, बेळगांव.
३२) मंत्रालयातील सर्व विभाग,
३३) मंत्रालयाच्या निरनिराळ्या विभागांच्या अधीन असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख,
३४) सर्व विभागीय आयुक्त,
३५) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
३६) सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष
३७) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
३८) संचालक (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे,
३९) संचालक (तंत्र शिक्षण), महाराष्ट्र राज्य, मुंबई,
४०) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
४१) संचालक, महानगरपालिका प्रशासन, मुंबई,
४२) कुल सचिव, सर्व कृषि व कृषितर विद्यापीठे,
४३) बहुजन समाज पार्टी, डी-१ इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई ४००००१
४४) भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ.बॅरॅक नं. १, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक,नरिमन पॉईंट , मुंबई ४०००२०
४५) भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभुवन, एस.व्ही.पटेल रोड,, मुंबई ४००००४
४६) भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई ४०००१३
४७) इंडियन नॅशनल काँग्रेस, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई ४०००२५
४८) नॅशनलिस्ट काँग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई ४०००२१
४९) शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई ४०००२८
५०) वित्त विभागातील सर्व कार्यासने,
५१) निवड नस्ती, कार्यासन सेवा-४.

Dearness Relief Increase to 53% on Pension/Family Pension w.e.f. 1st July, 2024.

Government of Maharashtra
Finance Department
Government Resolution No.: DRP-2025/CR.05/SER-4
Hutatma Rajguru Chowk, Madam Cama Road,
Mantralaya, Mumbai 400 032.
Date: 28 February,2025.

<u>Read -</u>

Government Resolution, Finance Department No.: DRP-2024/C.R 49/SER-4, dated 10.07.2024

Resolution

Government is pleased to decide that the rate of dearness relief with effect from 1st July, 2024 will be revised from 50% to 53% to the State Government pensioners /family pensioners on their Basic Pension/Family Pension. Revised dearness relief with arrears from 1st July 2024 will be payable in cash with pension / family pension of the month of february 2025.

2. It will be the responsibility of the Pension Disbursing Authority, i.e. the Pay and Accounts Officer, Mumbai/Treasury Officers, as the case may be, to calculate the quantum of dearness relief payable in each individual case.

3. Government is also pleased to direct that above decision should mutatis mutandis, apply to those pensioners including family pensioners of Recognised and Aided Educational Institutions, Agricultural / Non-Agricultural Universities and Affiliated Non-Government colleges to whom the pension scheme is made applicable.

4. In exercise of the powers conferred by the proviso to Section 248 of the Maharashtra Zilla Parishads and Panchayat Samitis Act, 1961 (Mah.V of 1962) and of all the other powers enabling it in that behalf. Government is further pleased to decide that the above decision shall apply to the pensioners including family pensioners of Zilla Parishads.

5. The expenditure on this account should be debited to the Budget Heads to which the retirement benefits of the employees mentioned in the above paras are debited and should be met from the grants sanctioned thereunder.

6. All orders in force in regard to the payment of relief on pension sanctioned by Government from time to time will, mutatis mutandis, apply to the dearness relief now sanctioned.

7. This Government resolution of Maharashtra Government is available at the website www.maharashtra.gov.in. Reference no. for this is 202502281445355705. This order has been signed digitally.

By order and in the name of the Governor of Maharashtra.

MANISHA YUVRAJ KAMTE

Digitally signed by MANISHA YUVRAJ KAMTE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FINANCE DEPARTMENT, 2.5.4.20=a7f08db3910ecf0f88c442fbde20f7b84e70dfd0bf4dcd977abab75b3fcb8508, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=11602E78DA072F96AF0EDE7966315FA5B93A2119E4A490D340E527F96DBA01D3, cn=MANISHA YUVRAJ KAMTE
Date: 2025.02.28 14:48:08 +05'30'

(Manisha Kamte)
Deputy Secretary to Government of Maharashtra

****